


मराठा सेवा संघ प्रणीत

# अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

रजि.नं.एएनआर/आरएसआर/सीआर/२८९७/२००० दि. २५/१०/२०००
अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर
मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊ मार्ग, बारातोटी कारंजा, अहमदनगर. फोन : (०२४१) २३५४९०७

जा. क्र. अ.जि.म.से.ना.सह. पतसंस्था/ अधिमंडळाची बैठक /५७/२०२३ दि. ०८/०९/२०२३

## अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीचे सूचनापत्र
**(फक्त सभासदांकरिता)**

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २३ वी अधिमंडळाची वार्षिक बैठक शनिवार, दि. २३ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी २ :०० वाजता **शेतकरी निवास सभागृह, किसान क्रांती बिल्डिंग, मार्केट यार्ड, अहमदनगर येथे संस्थापक अध्यक्ष, चेअरमन शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांच्या कामकाजाकरिता आयोजित केली आहे.  कृपया सर्व सभासदांनी बैठकीस उपस्थित राहावे, ही विनंती.

## बैठकीपुढील विषय

१. दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
३. वैधानिक लेखापरीक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
५. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाची आणि गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
६. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
७. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे
८. सन २०२१-२०२२ मधील वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९. उपविधी दुरुस्तीबाबत विचारविनिमय करणे. (अहवालातील आतील पान नं. १९ वर दिलेल्या तक्त्याप्रमाणे )
१०. मा. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
अशोक बापूराव वारकड
मुख्य कार्यकारी अधिकारी
अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी
सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

स्थळ : अहमदनगर
दिनांक :  ०८/०९/२०२३

**टीप :**

१) कोरमअभावी बैठक तहकूब झाल्यास, त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून बैठकीचे कामकाज सुरू करण्यात येईल. तहकूब झालेल्या बैठकीस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे असलेल्या विषयासंबंधी माहिती पाहिजे असल्यास, तसेच काही प्रश्न अगर सूचना द्यावयाच्या असल्यास दि. १८/०९/२०२३ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात.
३) गुणगौरव समारंभ बैठकीच्या ठिकाणी सकाळी ११:०० वा. आयोजित केला आहे.

## ✻ गुणगौरव समारंभ ✻

मराठा समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेले समाजबांधव व भगिनी, तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी व गुणवंतांचा मराठा सेवा संघ व मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर यांच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव समारंभ **शनिवार, दि. २३ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता शेतकरी निवास सभागृह, किसान क्रांती बिल्डिंग, मार्केटयार्ड, अहमदनगर येथे आयोजित केलेला आहे.** तरी सर्व समाजबांधवांनी या समारंभास उपस्थित राहावे.

या समारंभासाठी विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्य मिळविलेले समाजबांधव, तसेच एस.एस.सी. (दहावी) परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त व एच.एस. सी.(बारावी) परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, प्रज्ञाशोध परीक्षा, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी., मेडिकल, इंजिनिअरिंग व विविध परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी त्याचप्रमाणे सर्व शाखांचे पदवी व पदव्युत्तर परीक्षा शेकडा ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, तसेच कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रांत जिल्हा, राष्ट्रीय व राज्य पातळीवर प्रावीण्य मिळविलेले विद्यार्थी व विद्यार्थिनींनी किंवा त्यांच्या पालकांनी अधिकृत प्रमाणपत्र व गुणपत्रिकाच्या छायांकित प्रतीसह तसेच स्वतःचा पत्ता व **फोन नंबरसह दि.२० सप्टेंबर २०२३ पर्यंत मराठा पतसंस्थेच्या व्हॉटसॲप नंबरवर अथवा मुख्य कार्यालयात पाठवावी.**

**Whatsapp No. 7768012484**

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संस्थापक अध्यक्ष, चेअरमन

**इंजि.सुरेश इथापे**
जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, अ.नगर

## ✻ सभासदांना नम्र आवाहन ✻

- ✻ सभासदांनी आपला पत्ता व वारस इत्यादींमध्ये बदल झाला असेल तर तावडतोब संस्थेस कळवावे, म्हणजे संस्थेच्या दफ्तरी त्याप्रमाणे योग्य नोंदी करता येतील.
- ✻ सर्व सभासदांनी संस्थेतील विविध ठेव योजनांचा लाभ घ्यावा व इतरांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावेत आणि संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा.
- ✻ संस्थेच्या सर्व कर्जदार सभासदांनी कर्जफेड वेळेवर व मुदतीत करून संस्थेस सहकार्य करावे, तसेच आपण ज्या कर्जदारांना जामीन आहात, ते कर्जदार वेळेवर कर्जाचे हप्ते भरतात की नाही याकडे लक्ष ठेवावे.

**✻ शेअर सर्टिफिकेट –** ज्या सभासदांनी शेअर सर्टिफिकेट नेलेले नाहीत त्यांनी शेअर सर्टिफिकेट पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयातून घेऊन जावेत.

**✻ लाभांश वाटपाबाबत –** ज्या सभासदांनी पतसंस्थेमध्ये बचत खाते उघडले आहे, त्यांचा लाभांश सभासदांच्या बचत खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे. ज्या सभासदांनी बचत खाते उघडलेले नसेल, त्यांनी बचत खाते उघडावे. म्हणजे लाभांशाची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करणे शक्य होईल.

 



# सल्लागार मंडळ

शिवश्री सुरेश कोंडीराम इथापे (जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ),शिवश्री राजेश गणपत परकाळे (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड), शिवमती संपूर्णा किसन सावंत (जिल्हाध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड ), शिवश्री प्रा. खासेराव हणुमंत शितोळे, शिवश्री प्रा.पोपटराव मारुती काळे, शिवश्री निवृत्ती माधवराव कोल्हे, शिवश्री डॉ. शरद गोविंदराव ठुबे, शिवश्री राजेंद्र मारुती ससे, शिवश्री मच्छिंद्र मल्हारी तांबे, शिवश्री राधाकृष्ण वाळुंज, शिवश्री रवींद्र सुधाकर देशमुख, शिवश्री सुदाम लक्ष्मण मडके, शिवश्री ज्ञानदेव निवृत्ती रोहकले, शिवश्री शामराव कुलट, शिवश्री अशोक पांडुरंग कुटे, शिवश्री प्रशांत सुरेश नेटके.

**❊ मार्केटयार्ड, अहमदनगर शाखा**

शिवश्री तारकराम सीताराम झावरे, शिवश्री विनायक कृष्णाजी गरड, शिवश्री दत्तात्रय किसन ठुबे, शिवश्री चंद्रकांत शामराव मुळे, शिवश्री धर्मेंद्र दशरथ गिते, शिवश्री अतुल बाबुराव लहारे, शिवश्री दत्ता साठे, शिवश्री गोवर्धन पांडुळे, शिवश्री यशवंत धोंडीराम कदम, शिवश्री दौलत उत्तम मुठे, शिवश्री अमित धामणे, शिवश्री तात्यासाहेब दरेकर.

**❊ भिंगार शाखा**

शिवश्री कानिफनाथ नामदेव कासार, शिवश्री अर्जुनराव रामभाऊ बेरड, शिवश्री कैलास गंगाधर मोहिते, शिवश्री संजय माधवराव सपकाळ, शिवश्री शिवाजीराव बेरड, शिवश्री शांताराम मच्छिंद्र वाघस्कर, शिवश्री अनिल भागचंद तनपुरे, शिवश्री मल्लू धर्मराज औटी, शिवश्री शामराव देवीदास वाघस्कर,

**❊ संगमनेर शाखा**

शिवश्री डॉ. माणिक पंढरीनाथ शेवाळे, शिवश्री चंद्रभान शंकर नवले, शिवश्री गवराम विठोबा रहाणे, शिवश्री काशीनाथ नामदेव हांडे, शिवश्री बाळासाहेब जगन्नाथ आमटे, शिवश्री भास्कर दशरथ खताळ, शिवश्री प्रकाश संपत रहाणे, शिवश्री शांताराम माधव घुले, शिवश्री प्रवीण अरुण कानवडे, शिवमती मथुराबाई बिभिषण भोसले, शिवमती संगीता वसंतराव गायकवाड, शिवमती संजना संदीप शेळके.

**❊ नेवासा शाखा**

शिवश्री परशुराम मोहनीराज मते, शिवश्री रावसाहेब सदाशिव घुमरे, शिवश्री राजेश दत्तात्रय जगताप, शिवश्री रघुनाथ किसन आगळे, शिवश्री त्र्यंबक काशीनाथ सुकाळकर, शिवश्री अशोक मोहन साळुंके, शिवश्री ॲड. अनंत बाळकृष्ण दरंदले, शिवश्री बाळासाहेब बाबुराव देवखिळे, शिवश्री किशोर श्रीपती घणगे, शिवश्री पी.आर. जाधव, शिवश्री सूर्यकांत साहेबराव गव्हाणे, शिवश्री महेश विष्णू निपुंगे, शिवश्री मुरलीधर देवराव मते, शिवश्री जनार्धन नाथु हारदे, शिवमती शारदा रघुनाथ वांढेकर, शिवश्री मुरलीधर नामदेव कराळे, शिवश्री चंद्रकांत नारायण काळे, शिवश्री बबन कचरू पवार.

**❊ पाथर्डी शाखा**

शिवश्री नामदेव सदाशिव लबडे, शिवश्री बबनराव नानासाहेब जेधे, शिवश्री बापुसाहेब बबनराव कल्हापुरे, शिवश्री डॉ.बाळकृष्ण देवराम मरकड, शिवश्री योगेश सोपानराव वाकचौरे, शिवश्री प्रशांत विक्रम शेळके, शिवश्री सर्जेराव धोंडीराम काकडे, शिवश्री. सूर्यकांत दत्तू बोरूडे, शिवश्री विजय शेषराव चितळे, शिवश्री ॲड. चंद्रकांत नामदेव सातपुते, शिवश्री डॉ. राहुल शिवाजी देशमुख, शिवश्री पुरुषोत्तम राम कचरे, शिवश्री रवींद्र नामदेवराव मरकड, शिवश्री बाळकृष्ण आसाराम शेळके, शिवश्री चंद्रकांत बापुराव भापकर, शिवश्री बाळासाहेब कोकाटे, शिवमती शोभना पांडुरंग काकडे.

**❊ शेवगाव शाखा**

शिवश्री विजय भास्करराव देशमुख, शिवश्री शिवाजीराव अंबादास देवढे, शिवश्री विक्रमराव रावसाहेब दारकुंडे, शिवश्री राजेंद्र पोपटराव झरेकर, शिवश्री प्रमोद नारायण बोडखे, शिवश्री निलेश प्रमोद बोडखे, शिवश्री सतीश जगतराव मरकड.

**❊ कायदेशीर सल्लागार**

ॲड. माणिकराव मोरे, ॲड. शेखर दरंदले, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. विलास गरड, ॲड. भगवंत काळे,ॲड. संदीप खांदवे, ॲड. प्रदीप कर्डीले, ॲड. शिवाजी कराळे, ॲड. शिल्पा बेरड, ॲड. अनुराधा येवले, ॲड. कृष्णा झावरे, ॲड. अशोक गुंडपाटील, ॲड. नितीन काळे, ॲड. नितीन अडसुरे, ॲड. दादाभाऊ वर्पे, ॲड. प्रियंका औटी, ॲड. मधुकर भांगरे, ॲड. साहेबराव चौधरी, ॲड. कृष्णा मोटे, ॲड. विजय गवांदे. उच्च न्यायालय – ॲड. शिवाजी शेळके, ॲड. नितीन गवारे, ॲड. अभिजीत मोरे, ॲड. दत्ता नागोडे.

**❊ गोल्ड व्हॅल्युअर**

**मुख्य व मार्केटयार्ड शाखा –** प्रियांक बेल्हेकर, **भिंगार शाखा** अशोक अंबिलवादे, **नेवासा शाखा –** विजय दहीवाळकर, **पाथर्डी शाखा–** अरविंद जोजारे, **संगमनेर शाखा –** महेश मयुर **प्रॉपर्टी व्हॅल्युअर –** इंजि.आबासाहेब कर्डिले, इंजि. डी.ई. भगत, इंजि. मनिष गुळवे, इंजि. बाळासाहेब गिरो.

## ✻ संचालक मंडळ ✻

| | | |
|---|---|---|
| १ | शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे (B.E. Civil, M.Sc.) | संस्थापक अध्यक्ष, चेअरमन |
| २ | शिवश्री पत्रकार किशोर मोहनराव मरकड (B.Com., B.C.J.) | व्हा.चेअरमन |
| ३ | शिवश्री लक्ष्मणराव भानुदास सोनाळे (B.A) | मुख्य प्रवर्तक,संचालक |
| ४ | शिवश्री ज्ञानदेव दत्तात्रय पांडुळे (B.A) | संचालक |
| ५ | शिवमती राजश्री रवींद्र शितोळे (B.A.,L.LB.) | संचालिका |
| ६ | शिवश्री सतीश शंकरराव इंगळे (M.Com.) | संचालक |
| ७ | शिवश्री बाळकृष्ण मारुती काळे (B.Com.) | संचालक |
| ८ | शिवमती शोभाताई बाबासाहेब जाधव (M.A,MMR) (दि.९/५/२०२३ पर्यंत) | संचालिका |
| ९ | शिवश्री प्रा. किसन सखाराम पायमोडे M.A.(I), DHE (I) | संचालक |
| १० | शिवश्री यशवंत(कालिदास) जयवंतराव शिंदे (D.Pharm.) | संचालक |
| ११ | शिवश्री ॲड. काशिनाथ कुंडलिक डोंगरे (M.Com., GDC&A,LLB) | संचालक |
| १२ | शिवमती निर्मला कैलास गिरवले (S.S.C) (दि.९/५/२०२३ पर्यंत) | संचालिका |
| १३ | शिवश्री ज्ञानेश्वर (उदय) भाऊसाहेब अनभुले (B.Com., M.S.W) | संचालक |
| १४ | शिवश्री इंजि.संभाजी मोहनीराज मते (D.C.E.) | संचालक |
| १५ | शिवश्री द्वारकाधीश उत्तमराव राजेभोसले (B.Com.,M.B.A.) | संचालक |
| १६ | शिवश्री इंजि. बाळासाहेब दशरथ सोनाळे D.(E&T/C)E | संचालक |
| १७ | शिवमती डॉ. कल्पना शरद ठुबे (M.D. Homoeopathy) | संचालिका |
| १८ | शिवश्री ॲड. राजेश दत्तात्रय कावरे (B.A. L.L.B.) | संचालक |
| १९ | शिवश्री प्रा. पोपटराव मारुती काळे (M.A.,Bed., LLB) (दि.९/५/२०२३ पर्यंत) | तज्ज्ञ संचालक |
| २० | शिवश्री सी.ए. विश्वास अरविंद कारंजकर (B.Com.,CA.,C.S.) (दि.९/५/२०२३ पर्यंत) | तज्ज्ञ संचालक |
| २१ | शिवश्री राजेंद्र नामदेव ढोणे (B.A.D.C.M.) | तज्ज्ञ संचालक |
| २२ | शिवश्री अच्युत रामचंद्र गाडे (B.A.) | तज्ज्ञ संचालक |






# कर्मचारीवृंद

| | | |
|---|---|---|
| १ | शिवश्री अशोक बापुराव वारकड (B.A., B.com., GDC&A) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | शिवश्री बबन बाबुराव सुपेकर B.Com., G.D.C.&A. | सह. व्यवस्थापक |
| ३ | शिवश्री अशोक रामनाथ अरगडे B.Com., G.D.C.&A. | शाखाधिकारी – संगमनेर शाखा |
| ४ | शिवमती अनुपमा बापुसाहेब भापकर B.A., D.C.M. | शाखाधिकारी – मार्केट यार्ड शाखा |
| ५ | शिवश्री प्रितेश रेवन्नाथ बोरुडे B.A., D.C.M. | शाखाधिकारी – भिंगार शाखा |
| ६ | शिवश्री महेशकुमार आसाराम नलवडे M.Sc., G.D.C.& A. | शाखाधिकारी – शेवगाव शाखा |
| ७ | शिवमती पुष्पा विनायक इंगळे M.A.,B.Ed. | शाखाधिकारी – मुख्य शाखा |
| ८ | शिवश्री संतोष रघुनाथ पारखे M.A., M.Ed. | प्र. शाखाधिकारी – नेवासा शाखा |
| ९ | शिवश्री गणेश विष्णू खोर्दे B.A. | प्र. शाखाधिकारी – पाथर्डी शाखा |
| १० | शिवश्री गोरख रामदास काटे M.A. | वसुली अधिकारी – मुख्य शाखा |
| ११ | शिवश्री रणजित हरिभाऊ रकटाटे M.Com., G.D.C.&A. | लेखाधिकारी – मुख्य शाखा |
| १२ | शिवमती कविता राजेंद्र ढोणे D.Ed., B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक – मुख्य शाखा |
| १३ | शिवमती प्रियंका रामदास शिंदे B.Com., G.D.C.&A. | कनिष्ठ लिपिक – भिंगार शाखा |
| १४ | शिवश्री सूर्यकांत मारुती कडू B.Sc. G.D.C.&A. | कनिष्ठ लिपिक – नेवासा शाखा |
| १५ | शिवमती दीपमाला नीलेश पवार M.Com. | कनिष्ठ लिपिक – मार्केट यार्ड शाखा |
| १६ | शिवश्री प्रभाकर बबनराव जेधे B.A. B.Ed. | कनिष्ठ लिपिक – पाथर्डी शाखा |
| १७ | शिवश्री दिलीप संपत खर्डे B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक – संगमनेर शाखा |
| १८ | शिवमती मंजुश्री राजेश गुंजाळ B.Com. | कनिष्ठ लिपिक – संगमनेर शाखा |
| १९ | शिवश्री प्रशांत महादेव बोरुडे H.S.C. | कनिष्ठ लिपिक – मार्केट यार्ड शाखा |
| २० | शिवमती रोहिणी रावसाहेब मुळे M.Sc.,B.Ed. | कनिष्ठ लिपिक – शेवगाव शाखा |
| २१ | शिवश्री नीलेश विष्णू जाधव B.A., (Appeared) | सहाय्यक – नेवासा शाखा |
| २२ | शिवश्री शशिकांत गुलाब बोरुडे S.S.C. | सहाय्यक – मुख्य शाखा |

# २३ वा वार्षिक अहवाल
# २०२२-२३

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

आदरपूर्वक जय जिजाऊ !!

आपल्या 'मराठा पतसंस्थेच्या' तेविसाव्या अधिमंडळाच्या बैठकीमध्ये आपल्या सर्वांचे मनःपूर्वक हार्दिक स्वागत!

पतसंस्थेची मागील दोन-तीन वर्षे अतिशय बिकट परिस्थितीत गेली. संचालक मंडळ तसेच पतसंस्थेच्या कर्मचारीवृंदास सुध्दा तारेवरची कसरत करावी लागली. तथापि, या सर्व अग्निपरीक्षेस यशस्वीरित्या तोंड देऊन आम्ही आपणासमोर पूर्वीच्याच जोमाने काम करण्यास उभे आहोत. दिनांक २३ एप्रिल २०२३ रोजी झालेल्या आपल्या पतसंस्थेच्या निवडणुकीमध्ये आपण सर्वांनी विजयकुमार ठुबे यांच्या नेतृत्वाखाली उभ्या असलेल्या राजमाता जिजाऊ सहकार पॅनलच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून दिले. खूप अटीतटीच्या झालेल्या या सहकार निवडणुकीमध्ये आपण सर्वांनी मोठ्या मनाने, नैतिकतेची कास धरून या पॅनलमधील नैतिक अधिष्ठान असलेल्या सर्व उमेदवारांना मतदान करून संपूर्ण पॅनलला निवडून आणले त्याबद्दल सर्व नवनिर्वाचित संचालकां तर्फे आम्ही आपणास लाख लाख धन्यवाद देतो व यापुढे आपल्या पतसंस्थेचे नाव संपूर्ण राज्यात अग्रभागी राहील अशी खात्री ही देतो!

आपल्या पतसंस्थेने सशाच्या गतीप्रमाणे प्रगती केलेली नसली तरीसुध्दा सध्याच्या पतसंस्था चळवळीतील अस्थिर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हळूहळू पण दमदार पावले टाकत यशस्वी वाटचाल चालूच ठेवली आहे. सर्व संस्थांच्या आयुष्यात चढउतार येतच असतात. तशीच काही चढउतार आपल्याही वाट्याला आले. या सर्व मानवनिर्मित चढउतारांना सामोरे जाऊन आपल्या पतसंस्थेने आपली पत राखून ठेवली व समाजाच्या दृष्टिकोनातून दखलपात्र प्रगती केली आहे. त्याचं सर्व श्रेय मा.आजी-माजी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी तसेच संचालक मंडळावर विश्वास ठेवणारे आपण सर्व जिवलग सभासद, हितचिंतक, सामाजिक भान ठेवणारे सर्व स्तरांतील नागरिक यांना जाते. त्यामुळे सर्व संचालक मंडळातर्फे आम्ही सर्व कर्मचारीवृंद व सन्माननीय सभासद, ठेवीदार व कर्जदार वर्गाचे मोकळ्या मनाने अभिनंदन करतो व आभारही मानतो. आपल्या पतसंस्थेचा दिनांक १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल व हिशेबाची पत्रके संचालक मंडळाच्या वतीने आपल्या सर्वांसमोर सादर करताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

मराठा सेवा संघाची स्थापना अकोले या जिल्ह्याच्या ठिकाणी दिनांक ३१ ऑगस्ट १९९० रोजी करण्यात आली. तेव्हापासून दि. १ सप्टेंबर हा 'मराठा सेवा संघाचा' वर्धापन दिन म्हणून आपण साजरा करतो. वर्धापन दिन हा राष्ट्रीय पातळीवर, प्रदेश पातळीवर, जिल्हा पातळीवर तसेच तालुका पातळीवरही साजरा होत असतो. त्यामध्ये लाखो सभासद सक्रिय भाग घेत असतात. यावर्षी राष्ट्रीय पातळीवरील वर्धापन दिन तेलंगणा राज्यातील 'बासर' येथे तर प्रदेश पातळीवर मुंबईमधील माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात साजरा करण्यात आला. मराठा सेवा संघाच्या कार्यरत असलेल्या ३३ कक्षांपैकी 'अर्थकोष कक्ष' हा एक महत्त्वाचा कक्ष ज्याला पत नाही, त्याला पत देण्यासाठी व कार्यकर्त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी या कक्षांची स्थापना झाली. या कक्षांतर्गतच 'अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर' म्हणजेच मराठा पतसंस्थेची स्थापना दिनांक २५ ऑक्टोबर २००० रोजी अहमदनगर येथे झाली. महाराष्ट्र राज्याचे सहकार खात्याचे तत्कालीन सहकार राज्यमंत्री कै. नामदार बाबासाहेब कुपेकर यांच्या हस्ते पतसंस्थेचे उद्घाटन झाले. त्यानंतर पतसंस्थेच्या फक्त संचालकांनीच नव्हे तर सभासदांनीसुद्धा अनंत कष्ट घेऊन समाजाचे देणे लागतो, या फकिरी भावनेने काम करीत योगदान दिले आहे व आजही देत आहेत. गेल्या २३ वर्षात पतसंस्थेने फक्त व्यवसाय न करता समाजाभिमुख काम करून अनेक व्यक्तींना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे केले आहे. अनेक तरुणांना देशात व परदेशात शिक्षण घेण्यासाठी आर्थिक पाठबळ दिले आहे. अनेकांना उद्योजक म्हणूनही समाजासमोर आणले आहे. ज्यांच्याकडे पत नाही त्यांना अर्थसहाय्य करत त्यांना समाजामध्ये पत निश्चितपणे मिळवून दिली आहे. अर्थात यांचे सर्व श्रेय मराठा सेवा संघाच्या परिवर्तनवादी चळवळीलाच जाते.

गेली काही वर्षे मराठा समाजासाठी आपले सर्वस्व अर्पण केलेल्या वयोवृद्ध व्यक्तींचे कार्य समाजासमोर आणण्यासाठी व त्यांच्याकडून इतरांनी प्रेरणा घ्यावी म्हणून मराठा पतसंस्था व मराठा सेवा संघ, अहमदनगर जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने या वयोवृद्ध व्यक्तींना 'जीवनगौरव' हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे कर्तव्य पतसंस्थेचे संचालक मंडळ निरपेक्ष भावनेने पार पाडत आहे.

आतापर्यंत पतसंस्थेने मराठा सेवा संघामार्फत स्मृतिशेष बबनराव मिस्कीन आबा यांना मरणोत्तर, स्मृतिशेष माधवराव मुळे, स्मृतिशेष डॉ. रावसाहेब अनभुले, शिवमती शोभाताई जाधव, प्रा. खासेराव शितोळे, प्रल्हादराव शितोळे, प्रा. पोपटराव काळे, जी. डी. खानदेशे, मा. दादाभाऊ कळमकर, प्रा. पुष्पाताई मरकड, प्रा. मेघाताई काळे तसेच शिवमती मंदाताई निमसे यांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन कृतज्ञता व्यक्त केली आहे. तर पीडित महिलांसाठी आपले तारुण्य अर्पण करणारे माऊली सेवा प्रतिष्ठानचे संचालक डॉ. राजेंद्र व डॉ. सुचेता धामणे या तरुण दांपत्यास 'कर्मतपस्वी' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

यावर्षी 'जीवनगौरव' पुरस्काराबरोबरच 'मराठा युवा पुरस्कार' तरुण उद्योजकास देऊन त्यांच्या पाठीवर थाप मारण्याची प्रस्तावित आहे. मराठा सेवा संघाचे, अहमदनगर जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश इथापे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शिवश्री राजेश परकाळे व जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा शिवमती संपूर्णा सावंत यांच्या विशेष सहकार्याने जिजाऊ सावित्री, दशकोत्सव, शिवजयंती, शिवराज्याभिषेक, राजर्षी शाहू जयंती इत्यादी अनेक सार्वजनिक कार्यक्रमांचे नियोजन पतसंस्थेच्या माध्यमातून दरवर्षी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गुणवंतांचे गौरव सोहळे, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन इत्यादी कार्यक्रम विविध क्षेत्रांतील अधिकारी व गुणवंत यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरे करत, जनजागृती करण्याचे काम पतसंस्थेच्या मार्फत केले जाते यांचा संचालक मंडळाला सार्थ अभिमान वाटतो.

मराठा पतसंस्थेने आता खऱ्या अर्थाने 'कात' टाकली आहे. गेली बावीस वर्षात बिनविरोध निवडणुका झाल्याने सभासदांमध्ये एक प्रकारची मरगळ आली होती. मात्र, या २२ वर्षानंतर निवडणूक झाल्यामुळे संपूर्ण जिल्हा ढवळून निघाला आहे. पतसंस्थेबद्दलची सभासदांची आस्था आम्हास अतिशय जवळून जाणवली. नवीन संचालक मंडळ आता जोमाने कामास लागले आहे. त्यास कर्मचारीवृंदांचीही साथ भेटत आहे. त्यामुळे आता थांबून चालणार नाही. या वर्षात ५० कोटीपर्यंत ठेवी वाढवण्याचे संचालक मंडळाचे लक्ष आहे. तर पुढील पाच वर्षात मराठा पतसंस्थेची ठेवी १०० कोटी पर्यंत नेण्याचे संचालक मंडळाचे उद्दिष्ट आहे. दैनंदिन बचत ठेवी वाढवून जास्तीत जास्त सभासदांना सक्रिय सहभागामध्ये सामाविष्ट करावयाचे आहे. आर्थिक परिस्थिती जशी चांगली होईल तशी स्पर्धात्मक परीक्षेसाठी स्वतंत्र अभ्यासिका उघडणे, अद्यावत ग्रंथालय उभे करणे, घराघरात पतसंस्थेचे सभासद करणे व समाजाला पतसंस्थेचा लाभ मिळवून देणे ही उद्दिष्टे संचालक मंडळांनी पुढील पाच वर्षासाठी ठेवलेली असून त्या दृष्टीकोनातून पावले उचलली आहेत.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी या अधिमंडळाच्या बैठकीच्या निमित्ताने आपण या समाजकार्याच्या जगन्नाथाच्या रथास आपल्या ऐपतीप्रमाणे सहकार्य करून हातभार लावावा व समाजाप्रती ऋण मानून फकिरीवृत्तीने योगदान देणाऱ्या या मराठा पतसंस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आर्थिक सहकार्य करावे, अशी नम्रपणे विनंती करतो. समाजातील सर्व स्थरातील घटकांना प्राधान्याने कर्ज वितरण करताना संस्था जी तत्परता व आस्था दाखविते तीच तत्परता व सकारात्मकता कर्जदारांनी वेळेवर कर्जाची परतफेड करताना दाखविली तर संस्था कमीत कमी कालावधीमध्ये सहज उद्दिष्टपूर्ती साध्य करेल, अशी आम्हास पूर्ण खात्री आहे. संपूर्ण संचालक मंडळ व निष्ठेने काम करणारे अधिकारी व कर्मचारी सदैव शंका निरसन करण्यास आपल्या सेवेसाठी उपलब्ध आहेत. आपल्या निरंतर विश्वासास कोणत्याही परिस्थितीत संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाकडून तडा जाणार नाही, अशी ग्वाही आम्ही देत आहोत.

संचालक मंडळाच्या झालेल्या निवडणुकीमध्ये ज्यांनी आमच्यावर उत्तुंग प्रेम केले, ज्यांनी अतिशय मोठे मन करून माघार घेतली, ज्यांनी पॅनल निवडून आणण्यासाठी प्रामाणिक व प्रचंड मेहनत घेतली त्यांच्याबद्दल आम्ही नेहमीच कृतज्ञ आहोत. त्यांचे ऋण कधीच विसरू शकत नाही. प्रा. खासेराव शितोळे सर, बबनराव रोहोकले, मा. प्रल्हादराव शितोळे सर, प्रा. पोपटराव काळे, शोभाताई जाधव, तात्याराम झावरे, निर्मलाताई गिरवले यांचे विशेष आभार! सर्व ठेवीदार, सभासद सर्व शाखांचे सल्लागार मंडळ तसेच हितचिंतकांचे संस्थेवरील प्रेम, निष्ठा व अतूट विश्वास यापुढे ही अटळ राहून भविष्यात जिजाऊ कृपेने वृध्दिंगत होईल व आपली पतसंस्था राज्यात एक नावाजलेली संस्था म्हणून नावारूपास येईल, अशी अपेक्षा बाळगतो. संस्थेचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंदपत्रक संचालक मंडळाच्या वतीने मान्यतेसाठी आपणास सादर करीत आहोत. आपल्या उपस्थितीबद्दल आपणास पुन्हा मनःपूर्वक धन्यवाद!

### ❊ सभासद

पतसंस्थेचे दि. ३१/०३/२०२३ अखेर ५०३८ भागधारक सभासद आहेत.

### ❊ भागभांडवल

दि. ३१/०३/२०२२ अखेर वसूल भागभांडवल रु. ५०,१६,३००.०० एवढे होते. अहवाल सालात भागभांडवलामध्ये रु. ३,२३,८००.०० इतकी वाढ झालेली आहे. दि. ३१/०३/२०२३ अखेर पतसंस्थेचे भागभांडवल रु. ५३,४०,१००.०० आहे.

### ❊ राखीव व इतर निधी

संस्थेकडे दि. ३१/०३/२०२२ अखेर रु. १,१५,६७,१२३.०३ इतका राखीव व इतर निधी शिल्लक होता. अहवाल सालात गत वर्षाच्या नफा वाटणीतून व चालू सालात केलेल्या तरतुदीमुळे रु. ३५,०७,५१५.८१ इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर राखीव इतर निधी रु. १,५०,७४,६३८.८४ झालेला आहे.

### ❊ ठेवी

दि. ३१/०३/२०२२ रोजी पतसंस्थेकडे रु. २६,११,४७,६७७.७१ एवढ्या एकूण ठेवी होत्या. अहवाल सालात त्यात रु. ३,८९,१५,२९७.४२ इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर एकूण ठेवी रु. ३०,००,६२,९७५.१३ झालेल्या आहेत.

### ❊ कर्ज वितरण

दि. ३१/०३/२०२२ अखेर रु. १९,८५,६८,६६४.९० एवढे कर्ज वितरण केलेले होते. अहवाल सालात त्यात रु. ३,७७,६३,५०१.१२ इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर एकूण कर्ज वितरण रु.२३,६३,३२,१६६.०२ झालेले आहे.

### ❊ मालमत्ता

अहवाल वर्षअखेर डेडस्टॉक, फर्निचर, संगणक इत्यादी रु. ९,७३,१७९.०० व नेवासा शाखा जागा रु. २५,९८,५४०.०० अशी एकूण रू. ३५,७१,७१९.०० संस्थेची मालमत्ता आहे.

### ❊ संचालक मंडळ व नातेवाईक कर्जे

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ७२ (२) अन्वये मा. संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडून दि. ३१/०३/२०२३ अखेर येणे कर्ज व थकबाकीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | अहवाल वर्षाअखेर येणे कर्ज रक्कम रुपये | थकित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | संचालकांची कर्जे | – | – |
| २ | संचालकांचे नातेवाईक यांची कर्जे | ८,१७,६३३.०० | – |

 



## ❊ अहवाल सालात झालेला नफा व नफा वाटणी :

पतसंस्थेला अहवाल सालात दि. ३१.०३.२०२३ अखेर रक्कम रुपये ८,१०,७९३.९२ निव्वळ नफा झालेला आहे. सभासदांना ८ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे. तसेच पुढीलप्रमाणे निव्वळ नफ्याची वाटणी करण्याची शिफारस मंडळाने केलेली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी, ही विनंती.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | **राखीव निधी** (एकूण नफा रकमेच्या ४० टक्के) | ३,२४,३१८.०० |
| २) | **लाभांश** (दि.३१/३/२०२२ वसूल भागभांडवल रक्कम रु. ५०,१६,३००.०० वर ८ टक्के) | ४,०१,३०४.०० |
| ३) | **धर्मादाय निधी** (एकूण नफा रकमेच्या १ टक्के) | ८,१०८.०० |
| ४) | **सभासद कल्याण निधी** (एकूण नफा रकमेच्या ५ टक्के) | ४०,५४०.०० |
| ५) | **इमारत निधी** | ३६,५२३.९२ |
| | एकूण | ८,१०,७९३.९२ |

## ❊ शाखा कामकाज

**संस्थेच्या एकूण मुख्य कार्यालयासह ७ शाखा आहेत. शाखेच्या ठेवी व कर्ज वितरणाची माहिती खालीलप्रमाणे**

| अ.नं. | तपशील | ठेवी रु. | कर्ज वितरण रु. |
|---|---|---|---|
| १) | मुख्य कार्यालय | १०,८८,९७,२६५.४६ | ६,४५,२९,१६७.०० |
| २) | भिंगार | १,६९,१७,७६४.७८ | ३,४३,४५,२३४.०० |
| ३) | संगमनेर | ४,२१,५८,१२०.३२ | ३,७५,६८,६६२.५२ |
| ४) | पाथर्डी | १,३३,१३,१०९.७० | २,७७,८९,६२३.५० |
| ५) | नेवासा | ३,२०,६५,०६७.२४ | २,६७,७१,४२९.०० |
| ६) | मार्केट यार्ड, अ.नगर | ७,७४,३६,८६४.६३ | ३,६७,६४,३१३.०० |
| ७) | शेवगाव | ९२,७४,७८३.०० | ८५,६३,७३७.०० |
| | एकूण | ३०,००,६२,९७५.१३ | २३,६३,३२,१६६.०२ |

## ❊ ऋणनिर्देश :

आपल्या संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी-माजी संचालकांचा तसेच सल्लागार व हितचिंतकांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या ग्राहकांच्या विश्वासावर आणि सहकार्याबद्दल संस्थेने भरीव प्रगती व कामगिरी केलेली आहे. त्यापुढील काळात संस्थेच्या भरभराटीसाठी आतापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याव्यतिरिक्त अधिक सक्रिय सहभागाची, मार्गदर्शन व विधायक सूचनांची आम्ही अपेक्षा करीत आहोत.

संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ॲड. पुरुषोत्तम खेडेकर साहेब, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी साहेब व तालुका उपनिबंधक किशन रत्नाळे साहेब व तालुका उपनिबंधक शुभांगी गोंड त्यांचे सहकारी, चार्टर्ड अकौंटंट डी. के. काळे, पराग मुथ्था, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर जिल्हा नागरी पतसंस्थेचे फेडरेशन, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन, उपनिबंधक सह.संस्था नगर तालुका यांचे कार्यालय, सर्व वर्तमानपत्रे व न्यूज चॅनेलचे संपादक, वार्ताहर व प्रतिनिधी, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, शंभुराजे युवा क्रांती यांनी अहवाल वर्षात दिलेल्या सक्रिय सहभागाबद्दल आपल्या सर्वांचे आम्ही व आमचे सर्व सहकारी आभार मानून मोकळे न होता सदैव आपल्या ऋणात राहून मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचा सन २०२२-२३ चा अहवाल सर्वांना सादर करीत आहोत.

धन्यवाद ! जय जिजाऊ ! जय शिवराय !

**पत्रकार शिवश्री किशोर मोहनराव मरकड**
व्हा. चेअरमन

**शिवश्री विजयकुमार गोविंदराव ठुबे**
संस्थापक अध्यक्ष, चेअरमन

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर






## ताळेबंद पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणी | दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे | दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **५०,००,०००.००** | **अधिकृत भागभांडवल** | | ५०,००,०००.०० |
| **५०,१६,३००.००** | **वसूल भागभांडवल** | ५३,४०,१००.०० | ५३,४०,१००.०० |
| **१,१५,६७,१२३.०३** | **राखीव व इतर निधी** | | १,५०,७४,६३८.८४ |
| ४४,१३,८०६.८० | राखीव निधी | ४९,०८,५२४.८० | |
| २०,८४,१२१.२३ | इमारत निधी | २३,२८,१८५.०४ | |
| ३०,००,०००.०० | संशयित, बुडीत व एन.पी.ए. कर्ज | ४८,००,०००.०० | |
| ८,००,०००.०० | थकित येणे व्याज | १५,००,०००.०० | |
| १,१३,३८६.०० | धर्मादाय निधी | ९४,१५०.०० | |
| २,४४,७३८.०० | सभासद कल्याण निधी | २,४८,५५८.०० | |
| ६,२४,८४६.०० | उत्तम कर्जावरील तरतूद | ७,०८,९९६.०० | |
| १,८६,२२५.०० | सांस्कृतिक कार्यक्रम निधी | १,८६,२२५.०० | |
| १,००,०००.०० | ग्रॅच्युईटी निधी | ३,००,०००.०० | |
| **२६,११,४७,६७७.७१** | **ठेवी** | | ३०,००,६२,९७५.१३ |
| ११,०४,४३,६९६.०० | मुदत | १०,६४,६३,७०७.०० | |
| २,६६,७८,५९७.७१ | बचत ठेव | ३,०४,२९,३६५.१३ | |
| १,३५,२५,४२८.०० | दामदुप्पट | १,८१,६९,६८२.०० | |
| ४,२०,७००.०० | संचित | ५,६७,१००.०० | |
| २४,२८,४९६.०० | दैनंदिन | ३९,२३,५४५.०० | |
| १०,४३,६१,१६१.०० | ज्येष्ठ नागरिक | १३,६२,८१,८३७.०० | |
| २५,०७१.०० | करंट खाते | २५,०७१.०० | |
| १४,२६,०२८.०० | कर्ज अनामत | १७,७३,७६८.०० | |
| ६,४५,५००.०० | जिजाऊ लखपती | ७,८६,१००.०० | |
| ११,९३,०००.० | शंभूराजे चिरंजीव | १६,४२,०००.०० | |
| **१,०९,३१,८८३.००** | **इतर देणी व तरतुदी** | | १,१५,५०,११०.०० |
| ७०,५७,०३०.०० | ठेवीवरील व्याज | ७६,३२,१३६.०० | |
| १,५९,३०३.०० | ऑडिट फी | १,८०,३६३.०० | |
| १२,२००.०० | निवडणूक निधी | १२,२००.०० | |
| २,०९,०४३.०० | बोनस | ३,५९,०४३.०० | |
| २,१२,०९६.०० | वसुली खर्च | २,१४,१६७.०० | |
| ४,५०,१४८.०० | कायदा खर्च | ५,५०,४४८.०० | |
| २४,२३,७३६.०० | अनामत | २१,८७,५७०.०० | |
| ५४,२२९.०० | लाभांश सन २०१९ | – | |
| ९२,०३६.०० | लाभांश सन २०२० | ८५,९३९.०० | |
| २,६२,०६२.०० | लाभांश सन २०२१ | २,६३,४२९.०० | |
| – | लाभांश सन २०२२ | ६५,६९५.०० | |
| **५,३५,४८,३४३.९५** | **शाखा देणे (दुबेरजी)** | ५,५१,१४,८३०.१० | ५,५१,१४,८३०.१० |
| **५,७६,४०४.८१** | **निव्वळ नफा** (दि. ३१/०३/२३) | ८,१०,७१३.१२ | ८,१०,७१३.१२ |
| **३४,२७,८७,७३२.५०** | **एकूण** | ३८,७९,५४,३२८.७९ | ३८,७९,५४,३२८.७९ |

दि.३१/०३/२०२३ अखेर

| दि.३१/०३/२०२२ | जिंदगी व येणी | दि.३१/०३/२०२३ | |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **१५,३१,६२२.००** | **रोख शिल्लक** | **११,०८,९३७.००** | **११,०८,९३७.००** |
| **२,५३,८०,५६१.६५** | **बँकेतील शिल्लक** | **३,१५,६०,६००.८७** | **३,१५,६०,६००.८७** |
| **५,०८,२३,२४१.००** | **गुंतवणूक** | **४,८९,७०,९११.००** | **४,८९,७०,९११.००** |
| **६२,४९६.००** | **डिपॉझिट** (कृषी उत्पन्न बाजार समिती) | **६२,४९६.००** | **६२,४९६.००** |
| **१९,८५,६८,६६४.९०** | **कर्ज व उचल** | | **२३,६३,३२,१६६.०२** |
| १,२३,८२,३६६.०० | वैयक्तिक | १,५९,८१,३४२.०० | |
| ३१,६१,८०४.०० | व्यावसायिक | ३५,३४,६११.०० | |
| २,२५,९६,०३६.४० | ठेव तारण | ३,२३,३९,९२४.४० | |
| ३०,४८,५९२.०० | वाहन तारण | ३४,०७,०४८.०० | |
| ११,३५,४१२.०० | दैनंदिन | १९,३६,३००.०० | |
| ५,७९,३२०.०० | सुलभ | ६,१४,१५१.०० | |
| ५,४३,८५,१५०.०० | सोने तारण | ५,५१,७५,७३६.०० | |
| २,७९,३४३.०० | सोने तारण कॅश क्रेडिट | – | |
| ३,७४,६०,०६३.५० | कॅश क्रेडिट | ५,२१,४८,६९४.६२ | |
| ६,३५,४०,५७८.०० | स्थावर तारण | ७,११,९४,३५९.०० | |
| **३४,५७,९२३.००** | **मालमत्ता** | | **३५,७१,७१९.००** |
| ८,५९,३८३.०० | फर्निचर डेडस्टॉक | ९,७३,१७९.०० | |
| २५,९८,५४०.०० | नेवासा शाखा जागा | २५,९८,५४०.०० | |
| **९४,१४,८८०.००** | **इतर जिंदगी** | | **१,१२,३२,५८८.००** |
| २५,०९,९६३.०० | बँक गुंतवणूक व्याज | ३०,५६,७४३.०० | |
| ६३,४६,३२३.०० | कर्ज व्याज येणे | ७२,६७,७८५.०० | |
| ४६,४८५.०० | ए. टी. एम. कार्ड | – | |
| ३५,०००.०० | ॲडव्हान्स | ८४,६००.०० | |
| ४,७७,१०९.०० | टी.डी.एस. | ८,२३,४६०.०० | |
| **५,३५,४८,३४३.९५** | **शाखा येणे (दुबेरजी)** | **५,५१,१४,८३०.९०** | **५,५१,१४,८३०.९०** |
| **३४,२७,८७,७३२.५०** | **एकूण** | **३८,७९,५४,३२८.७९** | **३८,७९,५४,३२८.७९** |

## नफा-तोटा पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रुपये पैसे | खर्च | दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे | दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **२,१०,४४,५५२.००** | **ठेवीवरील व्याज** | **२,४१,०६,२२८.००** | **२,४१,०६,२२८.००** |
| **१५,१४,८०३.००** | **बँक ओडी व्याज** | **८,८५,००५.००** | **८,८५,००५.००** |
| **५५,०४,२१४.००** | **शाखाअंतर्गत व्याज** | **६८,८३,५३७.००** | **६८,८३,५३७.००** |
| **३१,१६,६७८.००** | **कर्मचारी पगार व भत्ते** | | **३७,७८,९३१.००** |
| २४,३३,७७२.०० | कर्मचारी पगार | ३०,८४,३०६.०० | |
| २,८९,९९६.०० | कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी | ३,३६,०७१.०० | |
| – | गुणगौरव समारंभ | १५,४५०.०० | |
| ३,९२,९१०.०० | बोनस | ३,४३,१०४.०० | |
| **१७,६६,०७२.४९** | **प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च** | | **२५,८४,९२८.३८** |
| ३८,७५१.०० | छपाई व स्टेशनरी | ५२,३५३.०० | |
| ३५,९३३.०० | टेलिफोन | ४१,८७५.०० | |
| २६,९८०.०० | पोस्टेज | – | |
| १,५८,६०८.०० | सभा समारंभ | १,९१,५२१.०० | |
| ४,२८,९४६.०० | इमारत भाडे | ६,०२,८८६.०० | |
| २५,२६४.०० | महानगरपालिका कर | – | |
| ७०,०००.०० | कायदा खर्च | १,६०,२५८.०० | |
| १,७३,७१६.०० | घसारा | २,३०,७०२.०० | |
| ३१,८६५.०० | इलेक्ट्रिकल्स व फर्निचर दुरुस्ती | ५१,८२०.०० | |
| ४०,९२३.०० | इतर | १,६५,२७५.०० | |
| ६१,४८५.०० | प्रवास | १,०३,९९३.०० | |
| ६१,१६६.०० | सादिलवार | १,२४,७१०.०० | |
| ४८,१८०.०० | लाईट बिल | ८३,६३०.०० | |
| २०,२३७.०० | झेरॉक्स | २०,३२९.०० | |
| ९५,९१३.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल | १,२७,५७०.०० | |
| २५,५४२.०० | लॉकर भाडे | २१,०४६.०० | |
| १,५००.०० | व्यवसाय कर | – | |
| १,३४,३६४.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा | १,५१,११०.०० | |
| ३७,६२९.०० | विमा | ३८,४२०.०० | |
| ४,४८२.०० | वृत्तपत्रे व मासिक | ६,०१०.०० | |
| ४८,८५२.०० | प्रशिक्षण | ५१,२१२.०० | |
| ७,४१२.४९ | बँक कमिशन | १३,६८७.३८ | |
| १,५३,६०४.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ३,४०,६२१.०० | |
| ४,७२०.०० | वार्षिक वर्गणी | ५,९००.०० | |
| ३०,०००.०० | जाहिरात | – | |
| **१५,१४,२८६.००** | **तरतुदी** | | **३०,९८,५६६.००** |
| ४,५४,८६४.०० | एन.पी.ए. | १९,८९,४१५.०० | |
| ४,३९,४२२.०० | थकीत व्याज | ६,२५,००१.०० | |
| २,७०,०००.०० | उत्तम कर्ज व्याज | ८४,१५०.०० | |
| २,५०,०००.०० | ऑडिट फी | २,००,०००.०० | |
| १,००,०००.०० | ग्रॅच्युईटी | २,००,०००.०० | |
| **५,७६,४०४.८१** | **निव्वळ नफा ताळेबंदाकडे वर्ग** | **८,१०,७९३.९२** | **८,१०,७९३.९२** |
| **३,५०,३७,०१०.३०** | **एकूण** | **४,२१,४७,९८९.३०** | **४,२१,४७,९८९.३०** |

दि.०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३

| दि.३१/०३/२०२२ रुपये पैसे | उत्पन्न | दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे | दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **२,९३,५६,२२१.३०** | **मिळालेले व्याज** | | **३,५०,७२,१९७.३०** |
| २,५९,४१,६४३.०० | कर्जावरील व्याज | ३,०७,१५,४४९.०० | |
| ९,५१,९६०.०० | कर्जावरील दंड व्याज | १४,६८,९५०.०० | |
| २४,६२,६१८.३० | गुंतवणुकीवरील व्याज | २८,८७,७९८.३० | |
| **५५,०४,२१४.००** | **शाखाअंतर्गत व्याज** | **६८,८३,५३७.००** | **६८,८३,५३७.००** |
| **१,७६,५७५.००** | **इतर जमा** | | **१,९२,२५५.००** |
| ५,७९५.०० | जिल्हा बँक लाभांश | ६,७१०.०० | |
| १,६०,८३०.०० | प्रोसेस फी | १,८५,५४५.०० | |
| ९,९५०.०० | फॉर्म फी | – | |
| ३,५०,३७,०१०.३० | एकूण | ४,२१,४७,९८९.३० | ४,२१,४७,९८९.३० |

## अंदाजपत्रकापेक्षा सन २०२२-२३ मधील कमी-जादा झालेला खर्च व सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक

| खर्च खाते तपशील | सन २०२२-२३ सालासाठी अंदाज (रुपये पैसे) | सन २०२२-२३ प्रत्यक्ष झालेला खर्च (रुपये पैसे) | अंदाजपत्रकापेक्षा जादा (रुपये पैसे) | अंदाजपत्रकापेक्षा कमी (रुपये पैसे) | सन २०२३-२४ सालासाठी अंदाज (रुपये पैसे) |
|---|---|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | २,६५,००,०००.०० | २,४१,०६,२२८.०० | - | २३,९३,७७२.०० | ३,०१,३२,०००.०० |
| बँक ओडी व्याज | २,००,०००.०० | ८,८५,००५.०० | ६,८५,००५.०० | - | ११,०६,०००.०० |
| कर्जावरील रिबेट व्याज | १,००,०००.०० | - | - | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| सामोपचार परतफेड सवलत | ४,००,०००.०० | - | - | ४,००,०००.०० | ४,००,०००.०० |
| कर्मचारी पगार | ३५,००,०००.०० | ३०,८४,३०६.०० | - | ४,१५,६९४.०० | ३८,५५,०००.०० |
| कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी | ४,००,०००.०० | ३,३६,०७१.०० | - | ६३,९२९.०० | ४,२०,०००.०० |
| ग्रॅच्युईटी | २,००,०००.०० | २,००,०००.०० | - | - | १,००,०००.०० |
| वार्षिक रजेचा पगार | १,००,०००.०० | - | - | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| बोनस | ४,००,०००.०० | ३,४३,१०४.०० | - | ५६,८९६.०० | ४,००,०००.०० |
| प्रवास भत्ता | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | २०,०००.०० |
| छपाई व स्टेशनरी | ९०,०००.०० | ५२,३५३.०० | - | ३७,६४७.०० | ८०,०००.०० |
| टेलिफोन | ६०,०००.०० | ४१,८७५.०० | - | १८,१२५.०० | ३०,०००.०० |
| संचालक मंडळ भत्ते | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | २०,०००.०० |
| जाहिरात | १,५०,०००.०० | - | - | १,५०,०००.०० | १,००,०००.०० |
| पोस्टेज | ७०,०००.०० | - | - | ७०,०००.०० | २०,०००.०० |
| सभा समारंभ | २,००,०००.०० | १,९१,५२१.०० | - | ८,४७९.०० | २,००,०००.०० |
| गुणगौरव समारंभ | ९०,०००.०० | १५,४५०.०० | - | ७४,५५०.०० | ५०,०००.०० |
| इमारत भाडे | ६,००,०००.०० | ६,०२,८८६.०० | २,८८६.०० | - | ७,५३,६००.०० |
| महानगरपालिका कर | ३५,०००.०० | - | - | ३५,०००.०० | ५७,२००.०० |
| कोर्ट | ९०,०००.०० | १,६०,२५८.०० | ७०,२५८.०० | - | २,००,०००.०० |
| ऑडिट फी | ३,००,०००.०० | २,००,०००.०० | - | १,००,०००.०० | २,५०,०००.०० |
| घसारा | २,००,०००.०० | २,३०,७०२.०० | ३०,७०२.०० | - | २,८८,३००.०० |
| इलेक्ट्रिकल्स व फर्निचर दुरुस्ती | ४०,०००.०० | ५१,८२०.०० | ११,८२०.०० | - | ६५,०००.०० |
| इतर | ६०,०००.०० | १,६५,२७५.०० | १,०५,२७५.०० | - | १,६०,०००.०० |
| प्रवास | ८०,०००.०० | १,०३,९९३.०० | २३,९९३.०० | - | १,२९,०००.०० |
| सादिलवार | ७५,०००.०० | १,२४,७१०.०० | ४९,७१०.०० | - | १,५५,०००.०० |
| लाईट बिल | ६०,०००.०० | ८३,६३०.०० | २३,६३०.०० | - | ९०,०००.०० |
| झेरॉक्स | ४०,०००.०० | २०,३२९.०० | - | १९,६७१.०० | २५,०००.०० |
| संगणक दुरूस्ती व देखभाल | १०,०००.०० | १,२७,५७०.०० | १,१७,५७०.०० | - | १,५९,०००.०० |
| लॉकर भाडे | ५०,०००.०० | २१,०४६.०० | - | २८,९५४.०० | २६,०००.०० |
| आर. टी. ओ. ट्रेड सर्टिफिकेट | ४०,०००.०० | - | - | ४०,०००.०० | ४०,०००.०० |
| व्यवसाय कर | २,०००.०० | - | - | २,०००.०० | २,०००.०० |

## अंदाजपत्रकापेक्षा सन २०२२-२३ मधील कमी-जादा झालेला खर्च व सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक

| खर्च खाते तपशील | सन २०२२-२३ सालासाठी अंदाज<br>रुपये पैसे | सन २०२२-२३ प्रत्यक्ष झालेला खर्च<br>रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा<br>रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी<br>रुपये पैसे | सन २०२३-२४ सालासाठी अंदाज<br>रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| वार्षिक सर्वसाधारण सभा | २,००,०००.०० | १,५१,११०.०० | - | ४८,८९०.०० | १,८८,०००.०० |
| विमा | ५०,०००.०० | ३८,४२०.०० | - | ११,५८०.०० | ४८,०००.०० |
| वृत्तपत्रे व मासिक | ६,०००.०० | ६,०१०.०० | १०.०० | - | ७,५००.०० |
| प्रशिक्षण | ८०,०००.०० | ५१,२१२.०० | - | २८,७८८.०० | १,००,०००.०० |
| बँक कमिशन | १०,०००.०० | १३,६८७.३८ | ३,६८७.३८ | - | २०,०००.०० |
| दैनंदिन ठेव कमिशन | ३,००,०००.०० | ३,४०,६२१.०० | ४०,६२१.०० | - | ३,००,०००.०० |
| एन.पी.ए. तरतूद | १०,००,०००.०० | १९,८९,४१५.०० | ९,८९,४१५.०० | - | १०,००,०००.०० |
| थकित व्याज तरतूद | ५,००,०००.०० | ६,२५,००१.०० | १,२५,००१.०० | - | २,००,०००.०० |
| उत्तम कर्जावरील तरतूद | २,००,०००.०० | ८४,१५०.०० | - | १,१५,८५०.०० | २,००,०००.०० |
| निवडणूक खर्च तरतूद | ३,००,०००.०० | - | - | ३,००,०००.०० | ७,००,०००.०० |
| प्रोफेशनल व कन्सल्टंट फी | १९,०००.०० | - | - | १९,०००.०० | २,००,०००.०० |
| वार्षिक वर्गणी | ५,०००.०० | ५,९००.०० | ९००.०० | - | ७,३००.०० |
| नफा | ७,००,०००.०० | ८,१०,७९३.९२ | १,१०,७९३.९२ | - | ९,००,०००.०० |
| एकूण | ३,७५,५२,०००.०० | ३,५२,६४,४५२.३० | २३,११,२७७.३० | ४६,७८,८२५.०० | ४,३४,०३,९००.०० |

| उत्पन्न खाते तपशील | सन २०२२-२३ सालासाठी अंदाज<br>रुपये पैसे | सन २०२२-२३ प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न<br>रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा<br>रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी<br>रुपये पैसे | सन २०२३-२४ सालासाठी अंदाज<br>रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| | सालासाठी अंदाज | प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न | | | सालासाठी अंदाज |
| कर्जावरील व्याज | ३,२२,००,०००.०० | ३,०७,१५,४४९.०० | १४,८४,५५१.०० | - | ३,९२,००,०००.०० |
| कर्जावरील दंड व्याज | १२,००,०००.०० | १४,६८,९५०.०० | - | २,६८,९५०.०० | १,००,०००.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ४०,००,०००.०० | २८,८७,७९८.३० | ११,१२,२०१.७० | - | ३६,००,०००.०० |
| लाभांश | १२,०००.०० | ६,७१०.०० | ५,२९०.०० | - | ९,०००.०० |
| नोड्यूज | २,०००.०० | - | २,०००.०० | - | - |
| प्रोसेस फी | १,००,०००.०० | १,८५,५४५.०० | - | ८५,५४५.०० | ४,५०,०००.०० |
| फॉर्म फी | ३८,०००.०० | - | ३८,०००.०० | - | ४४,९००.०० |
| एकूण | ३,७५,५२,०००.०० | ३,५२,६४,४५२.३० | २६,४२,०४२.७० | ३,५४,४९५.०० | ४,३४,०३,९००.०० |

# शरीफजीराजे भोसले समाधीस्थळ : रणभूमी भातोडी

अहमदनगरपासून पूर्वेला १८ किमी कल्याण- बीड रस्त्यावर भातोडी हे ऐतिहासिक गाव वसलं आहे. येथे ऑक्टोबर १६२४ मध्ये आदिलशहा-मुघल आणि निजाम यांच्यात भातोडीचा महारणसंग्राम लढला गेला. भातोडीला जसा प्राचीन इतिहास आहे. तसा समृध्द भूगोलही आहे. भातोडीच्या वैभवशाली इतिहासाचे प्रमुख वैशिष्ट्ये हे शरीफजीराजे भोसले समाधीस्थळ. आज ते संपूर्ण महाराष्ट्राचे धारातीर्थ म्हणून ओळखले जाते. अवघ्या मराठी मनातले हे शक्तिस्थळ मोठे प्रेरणादायी मानले जाते.

राज्यातील ते मराठ्यांच्या इतिहासातील धगधगते अग्निकुंड आहे. ते सतत प्रज्वलित राहून मराठी मन पेटते ठेवत आहे. म्हणूनच भातोडीला भेट देणारे शिवप्रेमी येथे माथा टेकवून जातात. जाताना जगण्याचे बळ आणि शक्ती देते. या भातोडीत मेहेकरी नदी, इतिहासप्रसिध्द भातोडी तलाव, शेजारचा डाक बंगला, हत्ती बारव, नृसिंह मंदिर व तेथील इतर सर्व मंदिरे, घाट, धर्मशाळा, कलावंतीण महल आदी ऐतिहासिक अवशेष आपल्याला येथे विखुरले आहेत. हे गाव कधी काळी या अभेद्य तटबंदीच्या आत सुरक्षित आणि सुखी होते. आज त्याबाबतच्या संपन्नतेच्या भग्न पाऊलखुणा खूप काही सांगत आहेत. येथे मुघल व निजाम काळात तांदळाची - भाताची मोठी बाजारपेठ होती. येथील वाणी व्यापारी कोकणातून तांदूळ आणत आणि ते मराठवाड्यात विकत. याच भूमीत शहाजीराजे व शरीफजीराजे यांनी अतुलनीय पराक्रम गाजवला. गनिमीकाव्याने शत्रूंच्या महाबलाढ्य सैन्याचा धुव्वा उडविला. याच लढाईत शरीफजीराजेंना विरगती मिळाली. मेहेकरी नदीपात्रातील भातेश्वर मंदिर, त्यासमोरील शरीफजीराजांची समाधी तर मेहेकरी नदी तिरावर जिल्ह्यातील एकमेव श्रीनृसिंहाचे चिरेबंदी सुंदर मंदिर पारगाव - दौलावडागाव रस्त्यावरील सलाबतखानाने बांधलेला मजबूत विस्तीर्ण लांब-रूंद तलाव. तर दुसऱ्या बाजूला छत्रपती शिवरायांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी जीर्णोध्दार केले. पारगावमधील वाघेश्वरी म्हणजे दुर्गादेवीचे मंदिर आपल्याला खुणवते. याच तलावाची भिंती शहाजीराजांनी रात्रीच्या अंधारात सुरूंग लावून उध्वस्त केली. त्यावेळी तो पाण्याने तुडूंब भरलेला होता.त्या तलावातील पाण्याच्या प्रवाहाने मुघल, आदिलशाही दोन लक्ष फौजेची वाताहत झाली. इथं गनिमी काव्याच्या युध्द तंत्राचा मोठा वापर मराठ्यांनी केला. शहाजीराजांच्या ठायी असलेली धडाडी, बुध्दीमता, युध्द कौशल्याचा प्रत्यय या निमित्ताने जगाला आला. भातोडीत त्यावेळी मोठं लष्करी केंद्रं होतं. जिथे हत्ती, घोडयांना, सैनिकांना प्रशिक्षण दिले जात. आता तो प्रदेश भकास आणि उजाड दिसतोय. या लढाईचा विजय उत्सव भातवडी अन् कढीच्या जेवणाने निजामी लष्कराने साजरा केला. जगप्रसिद्ध भातोडीच्या युध्दानं नावाजलेली भातोडीची रणभूमी.

गावाने आजही आपलं ऐतिहासिकपण जपलेलं जाणवते. येथे कधी काळी समृध्द वाडासंस्कृती अस्तित्वात होती, ते वाड्यांच्या भग्नअवशेषावरून समजते. किशोर कदम हे येथील एक इतिहासप्रेमी तरूण शहाजीराजे भोसले, शरीफजीराजे भोसले यांच्या पराक्रमाचा, कर्तृत्वाचा इतिहास आपल्या गावात घडला याचा त्यांना मोठा अभिमान. तो वारसा जतन आणि संवर्धन करणारे ग्रामस्थ, श्री किशोर कदम यांच्या घरासमोर भातेश्वर नावाचे मध्ययुगीन शिवालय आहे. या मंदीराचे वैशिष्ट्ये म्हणजे या मंदीरात दोन शिवलिंग आहेत. भातोडीच्या लढाई प्रसंगी शहाजी राजांनी या मंदिरात एका शिवलिंगाची स्थापना केली होती असे ते सांगतात. या मंदिरातील दुसरे शिवलिंग हे प्राचीन वाटते. या मंदिराला भातेश्वर मंदिर का म्हणायचे? पूर्वी येथे मोठ्या प्रमाणावर वाणी लोकांची वस्ती होती. त्यांचा प्रमुख व्यवसाय भाताचा व्यापार करणे हा असल्याने येथे मोठी भाताची बाजारपेठ होती. वाणी व्यापाऱ्यांनी कोकणातून येथे आणलेला भात सर्वत्र पुरविला जात. म्हणून येथील काही लोकांची आडनावे पूर्वी भातपुरे असेही होते. त्यांनी त्याकाळी भातेश्वर देवस्थान उभारले. या मंदिरासमोर डाव्या बाजूला एक चिंचेचा फार मोठा जुना वृक्ष आहे. त्याखाली सलाबतखानाने बांधलेला जुना हौद आहे. त्या हौदात जवळ असणाऱ्या हत्ती बारवेत खापरी नळाद्वारे पाणी आणले जात होते.

या हौदाजवळच एक मोठा नव्याने बांधलेला चौथरा आपणास दिसतो. तो चौथरा म्हणजे छत्रपती शिवरायांचे सख्खे चुलते शरीफजीराजे भोसलेंची या लढाईत धारातीर्थी पडल्याची पवित्र जागा. येथेच त्यांच्यावर अंतिम संस्कार झाले. हे त्यांचे समाधीस्थळ. या समोरच्या चिंचेच्या पुरातन वृक्षाला जर कंठ फुटला तर तो म्हणेल, शरीफजीराजांनी माझ्यासारखीच चिवट झुंज दिली. त्या मनचेहराच्या गजदळांशी शरीफजीने अचूक भाल्यांच्या फेकीने मनचेहराचे हत्ती, सैन्य ठार केले त्यामुळे निजामाच्या विजयाचा मोठा एकमेव अडसर दूर झाला. तेव्हा त्रिशूळ, गदा, धनुष्यबाण, दंडधारी गजदळाने शरीफजीराजांना चोहोबाजूंनी घेरले अन् शरीफजीवर तीक्ष्ण बाणांनी हल्ला केला. त्यात ते धारातीर्थी पडले. त्यावेळी हा सर्व भाग रणभूमी होती. त्यास एकबंझी रणमैदान म्हणत. या सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या निसर्गरम्य डोंगरदऱ्यात पाचशे ते सातशे वर्षे वय असणारे जुनाट वृक्ष राजी आहेत. ते यादवकाळ, बहुमनी राजवट, निजामशाही, मुघल आणि ब्रिटिश आमदानीचे इतिहासाचे मुक साक्षिदार आहेत. शहाजीराजांच्या जीवनामध्ये भातोडीच्या लढाईला फार महत्त्व आहे. त्यामुळे शहाजीराजांचा निजामाच्या राजदरबारात दबदबा निर्माण झाला.

तो इतिहासप्रसिध्द तलाव सन १५६५ ते १५८८ या काळात सलाबतखानाने बांधला. त्यावेळी मुर्तुझानिजामशहा गादीवर होता. त्याचा वजीर सलाबतखान हा फार दूरदर्शी, बुध्दीमान आणि मुत्सद्दी होता. त्यानेच या काळात आताच्या पारगाव-दौलावडगाव रस्त्यावर ८०० एकरात मातीचा भराव टाकून तलाव पुर्ण केला. मेहेकरी नदीचे येथे विशाल पात्र नजरेच्या टप्प्यात येत नाही. जवळ जवळ दोन डोंगर जोडून हा विस्तीर्ण लांब व रूंद मजबूत तलाव बांधला. दि. ३१ऑक्टोबर १६२४ रोजी शहाजीराजांनी मुघल व आदिलशाही दोन लक्ष फौजेपुढे आपला निभाव लागणार नाही. हे ओळखून रात्री शत्रू सैन्य बेसावध असतांना या तलावाच्या भिंतीला सुरूंग लावून उडवून दिले. त्यावेळी हा तलाव पाण्याने तुडुंब भरलेला होता. तलावातील पाण्याचा जोरदार प्रवाहाने तलावाखालील शत्रू सैन्याची वाताहत झाली. त्यात शहाजीराजांनी जोरदार आक्रमण केले. त्यामुळे मुघल सम्राट जहांगीरखानाचा सेनापती लष्करखानाची फजिती झाली. पुढे इंग्रज आमदानीत सन १८६९ ते १८७३ मध्ये सुरुंगाने उडविलेली दोनशे मीटर जागा दगडांनी बांधून घेतली. येथील

तलावाच्या भिंतींच्या दगडी बांधकामात शिसे,जस्त ओतून भक्कमपणा आणलेला आहे. येथे दुहेरी भिंतीची रचना करण्यात आली आहे. खाली वनराईत लपलेल्या मातीच्या भरावाची प्रचंड अभेद्य भिंत दिसते. जवळच असणारा नागझिरा त्याचे पाणी कधीच अटत नाही. याच तलावात सुलताना चाँदबीबीने परीस फेकल्याचे सांगतात. भातोडीच्या लढाईबाबत शिवभारतकार राजकवी परमानंद नेवासकर लिहितात, महाप्रतापी जाधवराव यांच्या पराक्रमाने घाबरलेल्या निजामशहाने जाधवरावांविरूध्द गुप्त कट करण्याचे ठरविले ही बातमी मिळताच जाधवराव दिल्लीच्या मुघल बादशहास मिळाला. आदिलशहाने दिल्लीपतींशी संपर्क साधून निजामाविरुध्द मदत करण्याची विनंती केली. दिल्लीपतींनी ही विनंती मान्य करून आदिलशहाच्या मदतीस प्रचंड सैन्य पाठविले. त्यावेळी शहाजीराजे, शरीफजीराजे, मल्लराव, मंबाजी, नागोजी, परसोजी, हंबीरराव चव्हाण, मुधोजी फलटणकर, दत्ताजी जगन्नाथ, तसेच मन्सूर खान, जोहर खान, हमीद खान, फत्तेखान, आदी मुस्लिमवीर निजामशाहीचे रक्षण करीत होते. दिल्लीपतींच्या आज्ञेने जाधवराव पुत्रांसह निजामाविरुध्द प्रचंड सैन्यासह दक्षिणेत आले. त्यांनी मोठा पराक्रम करून निजामशहाचा मुलुखसुध्दा पादाक्रांत केला.

उत्तरेकडून मुघल व दक्षिणेकडून आलेल्या आदिलशाही सैन्यावर निजाम सेनापती मलिक अंबर, शहाजी आदी प्रभूती राजांसह चालून गेला. दोन्ही सैन्यात घनघोर युध्द झाले. घोडयांचे किंकाळणे, हत्तींचे चित्कार, विरांच्या सिंहगर्जना, धनुष्याचा टणत्कार, पताकांचा फडफडाट, भटांचा जयघोष यांनी आकाश दुमदुमून गेले. एकमेकांवर धावून जाणाऱ्या शूर योध्यांच्या जोराच्या पदघाताने पृथ्वी शतदा विदिर्ण झाली. वज्राप्रमाणे कठीण अशा हत्तींच्या सुळ्यावर वज्रमुष्टी योध्यांच्या तलवारी आदळू लागल्या. विरुध्द पक्षाच्या योध्यांचे तलवारीने दोन तुकडे करून क्षणातच एखाद्या विराचे मस्तकरहित शरीर जमिनीवर पडे. शेकडो बाणांनी विदिर्ण झालेल्या हत्तींच्या गंडस्थळातून मदरसासारखे अतिशय रक्त वाहू लागले. माणसे, घोडे, हत्ती यांच्या रक्ताचा सर्वत्र लाल चिखल झालेला दिसत होता.नदीकाठी मोठमोठे वीर जणू काही थकल्याप्रमाणे महानिद्रा घेऊ लागले. जमबाज, भालाधारक विरांकडून स्वार मारले गेल्याने घोडे क्रोधाने खवळून इतरत्र धावू लागले. शहाजी-शरीफजी, खेळोजी, मलिक अंबरचे सिध्दी तसेच हंबीरराव प्रभूती पराक्रमी विरांना बाण, चक्रे, तलवारी, भाले, पट्टे घेऊन मुघलांच्या अफाट सैन्याची कत्तल सुरू केली. तेव्हा ते जीव मुठीत घेऊन दाही‍दिशांनी पळू लागले. आदिलशाहीच्या सैन्यास पळताभुई थोडी झाली. ज्याच्या आड झालेल्या मुघल सैन्याच्या पिछाडीचे रक्षण करणाऱ्या मनचेहरास पाहून पराक्रमी भोसल्यांनी कापाकापी सुरू केली. हत्तीच्या आश्रयाने लढणाऱ्या मनचेहरास पराभूत करण्यासाठी कवचधारी भोसले लढू लागले.

शरीफजीने अचूक भाल्यांच्या फेकीने ते हत्ती सैन्य ठार केले. तेव्हा त्रिशूळ, गदा, धनुष्यबाण, दंडधारी गजदळाने अडवून शरीफजीस तीक्ष्ण बाणांनी मारले. शूरभावाच्या मरणाने दुःखी झालेल्या शहाजी राजांनी खेळकर्ण प्रभूती बंधूसह मनचेहरा व त्यांच्या सैन्यावर वेगाने चाल केली. शत्रूच्या हल्ल्याने मदोन्मत हत्ती मागे सरलेले पाहून मनचेहरा माघार घेऊ लागला. सुरक्षित हत्तीसह तो पळू लागताच निजामाच्या सैन्याने सिंहगर्जना सुरू केली. शहाजीराजांनी पळपुट्यांचा पाठलाग करून त्यांना कैद करून मलिक अंबरपुढे उभे केलं. त्या सर्वांना घेऊन मलिक अंबरने निजामापुढं हजर करून भोसल्यांच्या पराक्रमाची वाहवा केली. या भातोडीच्या लढाईने आपल्या अंगावर रोमांच उभे राहतात. ती रणभूमी मोठी वैशिष्ट्ये पूर्ण आणि ऐतिहासिक आहे. ज्या जागेवर शरीफजीराजे भोसले यांना वीरगती मिळाली ती जागा मराठ्यांनी संरक्षित करून छोटसं स्मारक बांधलं आणि दिवाबत्तीची सोय त्यावेळी केलेली होती, परंतु पुढे तो भीमपराक्रम, ती शौर्यगाथा हा अतुलनीय पराक्रम गाजवणारे शरीफजीराजे भोसले हे विस्मृतीत गेले. पुढे त्याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे ते समाधीस्थळ काळाच्या ओघात नामशेष झाले, परंतु पुन्हा मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा शोध घेताना अनेक इतिहासकार, मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधक आणि या समाधीस्थळाच्या शोधाच्या अनुषंगाने सापडलेल्या नोंदी लक्षात घेऊन ते पूर्वीचे समाधीस्थळ शोधण्याचा प्रयत्न झाला. त्यावर मोठी मत मतांतरे झाली. वादविवाद झाला आणि शेवटी इतिहासातील नोंदी व वर्णने लक्षात घेऊन सध्याची जागा निश्चित करण्यात आली.

इतिहासकारांनी गावाला विश्वासात घेऊन, गावकऱ्यांच्या मदतीने ते पूर्वीचे समाधीस्थळ शोधले त्यावेळी त्या परिसरात प्रचंड काटेरी झाडे झुडपे, दगडे अस्ताव्यस्त पडलेले होते. ती जागा साफ करून इतिहासप्रेमींनी तेथे अद्ययावत समाधीस्थळ उभारले. त्यामध्ये अनेक व्यक्ती, संस्था यांचा महत्त्वाचा वाटा आहे. भातोडी गावात मेहेकरी नदीपात्रात वीस बाय वीस बाय तीन फूट चौथऱ्यावर चार बाय तीन मापाचे स्मारक मार्बलमध्ये आकर्षक पद्धतीने बांधले आहे. त्यावर पुढील व मागील बाजूस दोन मार्बलवर लेख कोरले आहेत. त्यानुसार ३१ ऑक्टोबर २०१५ रोजी भातोडी ग्रामस्थ, गडकिल्ले सेवा समिती चिंचवड पुणे आणि गड वाट परिवार अर्थात प्रवास सह्याद्रीचा अहमदनगर या सर्वाच्या मदतीने हे ऊर्जा स्थळ आधुनिक पद्धतीने बांधण्यात आलेले आहे. तसेच या आकर्षक समाधीस्थळावर छत्रछाया उभी केली आहे. रणभूमी भातोडीवरील शरीफजीराजे भोसले यांचे समाधीस्थळ हे मराठ्यांचे धारातीर्थ आहे. ते शक्तिस्थळ आणि ऊर्जा स्थळ म्हणूनदेखील प्रसिद्ध आहे. शरीफजी राजे भोसले यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन!....




**संकलन,**

**प्रा. डॉ. नवनाथ काशिनाथ वाव्हळ**

इतिहास संशोधक, अहमदनगर,

मो. ९८ ८१ ८२ ७८ ३४

## * शाखा *

* **भिंगार -** ब्राह्मण गल्ली, भिंगार, अहमदनगर.
  फोन (०२४१) - २४४१०५१
* **संगमनेर -** विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स् , टेलिफोन ऑफिसजवळ,
  नवीन अकोले रोड, सावतामाळी नगर,
  फोन (०२४२५) - २२०७९१
* **पाथर्डी -** नगरपालिका गाळा नं. ३७, वीर सावरकर मैदान,
  भाजी बाजारतळ, पाथर्डी.
  फोन नं. (०२४२८) - २२३०३२
* **नेवासा -** ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोर,
  नेवासा फाटा, नेवासा, अहमदनगर,
  फोन (०२४२७)-२४४४५६
* **मार्केटयार्ड -** छत्रपती शिवाजी महाराज संकुल,
  कोठी रोड, मार्केटयार्ड, अहमदनगर.
  फोन नं. (०२४१) - २४५२५७३
* **शेवगाव -** शंभुतिर्थ, ढमाळ कॉम्प्लेक्स मिरी रोड
  शेवगाव मो.९७३०७७३९३३

## संस्थेची वैशिष्ट्ये

* अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्र * शहराचे मध्यवर्ती ठिकाणी मुख्य कार्यालय
* स्वभांडवलावर कर्ज वितरण * प्रशिक्षित सेवक वर्ग
* विनम्र व तत्पर सेवा * संपूर्ण संगणकीकृत व पारदर्शक कामकाज
* कार्यक्षम तज्ज्ञ संचालक मंडळ व ग्राहकाभिमुख योजनेतून गतिमान कामकाज
* चेक क्लेरिंग,डी. डी.,आर.टी.जी.एस.व एन.ई.एफ.टी.सुविधा उपलब्ध
* ठेवीवर सर्वाधिक व्याज.

**सामाजिक उपक्रम : * महापुरुषांचे जयंती उत्सव * गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव * सभासदांना वैद्यकीय मदत * सामाजिक गौरव समारंभाचे आयोजन * २००० पेक्षा जास्त युवकांना उद्योगधंद्यासाठी अर्थसाह्य**

**कार्यालयीन वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०**
**साप्ताहिक सुट्टी रविवार - २ रा व ४ था शनिवार बंद.**

**- कॅश व्यवहार वेळ -**
**सकाळी ११.०० ते दुपारी ३.३०**

# उपविधी दुरूस्ती

| उपविधीचा अ.नं. | संस्था उपविधीची शब्द रचना | दुरुस्त झाल्यानंतर होणारी शब्द रचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| ७ | भागभांडवल<br>संस्थेच्या दर्शनी भागाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त ) इतके राहील.<br><br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास लाख मात्र ) इतके असून ते रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) दर्शनी किंमतीच्या ५०,०००/- इतक्या भागात विभागलेले असेल | भागभांडवल<br>संस्थेच्या दर्शनी भागाची किंमत रु. १००/- (अक्षरी रूपये शंभर फक्त ) इतके राहील.<br><br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. १,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी मात्र ) इतके असून ते रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) दर्शनी किंमतीच्या १,००, ०००/- इतक्या भागात विभागलेले असेल | अधिकृत भागभांडवलाची मर्यादा ओलांडली असल्यामुळे |
| १५(२) | संस्थेच्या व्यवसायात थेट सहभाग असण्याची किमान पात्रता<br>२) त्याने संस्थेचा किमान एक भाग धारण केलेला असावा | संस्थेच्या व्यवसायात थेट सहभाग असण्याची किमान पात्रता<br>२) त्याने संस्थेचे किमान १० भाग धारण केलेले असावेत. | संस्थेच्या भागभांडवलामध्ये वाढ होण्यासाठी व संस्थेचा व्यवसाय वृध्दीसाठी |
| ४४(५) | संचालक पदासाठी अपात्र होणे<br>५) अन्य कोणत्याही नागरी सहकारी पतसंस्थेचा संचालक असल्यास | संचालक पदासाठी अपात्र होणे<br>५) अन्य कोणत्याही जिल्हा कार्यक्षेत्र असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थेचा संचालक असल्यास | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अ मधील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे |







# ठेवीचे व्याज दर

| सेव्हिंग्ज खाते ७% | ४६ दिवस ८.००% | ९१ दिवस ८.५०% | १८१ दिवस ९.००% | १ वर्षाच्या पुढे ९.५०% |
|---|---|---|---|---|

| जिजाऊ लखपती ठेव योजना | दामदुप्पट ठेव योजना | शंभुराजे चिरंजीव ठेव योजना |
|---|---|---|
| दरमहा १४००/- रू. भरा ६० महिन्यानंतर **१ लाख रू. मिळवा.** | दामदुप्पट ठेव योजने अंतर्गत ८४ महिन्यांनी ठेव रक्कमेच्या दुप्पट रक्कम | दरमहा १०००/- रू. भरा ७५ महिन्यानंतर **१ लाख रू. मिळवा.** |

ज्येष्ठ नागरीकांसाठी १२ महिन्याच्या मुदत ठेवीवर १०.००% **दरमहा व्याज सुविधा**




**कमीत कमी व्याजदरात**
**सोने तारण कर्ज सुविधा**






## विविध कर्ज योजना

- वैयक्तिक कर्ज - १५.००%
- व्यावसायिक कर्ज - १३.००%
- स्थावर तारण कर्ज - १३.००%
- कॅश क्रेडिट कर्ज - १३.००%
- पर्यटन कर्ज १०.००%
- शैक्षणिक कर्ज १०.००%